# दि अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,अकोला

## निविदा सुचना

बँकेच्या अकोला व वाशिम जिल्हयातील शाखा कार्यालयावर विद्युत भारनियमनास पर्यायी व्यवस्था म्हणून ५ के.व्ही.ए. क्षमतेचे ३३ जनरेटर संच कार्यान्वीत आहेत. सदर जनरेटर व्यवस्थीत सुरु राहणेकरीता दुरुस्ती व सर्व्हीसींग करणे संबंधी वार्षिक देखभाल करार करावयाचा असुन त्याबाबत खालील अटी व शर्तीस अधिन राहुन निविदा मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती :**

१) ५ के.व्ही.ए. क्षमतेचे ३३ जनरेटर संचाचे दुरुस्ती व सर्व्हीसींग संबंधी नॉनकॉम्प्रेसिव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल करार करावयाचा असुन करार हा १ वर्षाचा राहील.

२) ५ के.व्ही.ओ.जनरेटर संचाची सर्व्हीसींग/ दुरुस्ती करीता आवश्यकतेप्रमाणे ऑईल, ऑईल फिल्टर, डिझल फिल्टर, एअर फिल्टर व कुलंट बदलविणे इ.बाबींचा सर्व्हीसींग मध्ये समावेश राहील.

३) शाखेतील जनरेटर सर्व्हिसींग दरमहा करावी लागेल.

४) जनरेटर संचाची सर्व साहीत्याची सर्व्हिसींग करून देण्यात यावी व महिन्यात जनरेटरसंच दुरूस्ती /पाहणी संदर्भात ठरविले पेक्षा जास्त व्हीजीट वेगळा चार्ज देण्यात येणार नाही.

५) जनरेटर संचासाठी आवश्यकतेप्रमाणे लागणारे सर्व साहीत्य हे आपणाकडून पुरविण्यात येवून बसविण्यात यावे व ते योग्य दर्जाचे असावे, साहीत्य खरेदी करीता होणाऱ्या खर्चाची रक्कम बँकेकडून अदा करण्यात येईल.

६) जनरेटर संच सर्व्हीसींग करते वेळी लागणारे स्पेअरपार्ट व दुरूस्ती/सर्व्हिसींग करीता आवश्यक टुल्स हे नेण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील.

७) जनरेटर वापरामधील चुकीमुळे व इतर कारणामुळे तांत्रीक बिघाड झाल्यास ती दुरूस्ती निविदा धारकास करून द्यावी लागेल.

८) सदर सर्व्हीसींग वार्षिक देखभाल करारामध्ये प्रवास खर्च वेगळा देण्यात येणार नाही.

९) जनरेटर संचामधील ऑईल फिल्टर,डिझेल फिल्टर,ऑईल बदलविणे,रबरी पार्ट,फॅनबेल्ट,इंजिन फाऊडेशन बुश,रेडीयटर बुश,वर्षातुन एक वेळा व आवश्यकतेप्रमाणे लावावे लागतील. तसेच कराराव्यतिरिक्त लागणारे ऑईल,कुलंन्ट, डीस्टील वॉटर, लेव्हल करणे करीता सदर साहीत्य बँक पुरवेल.

१०) जनरेटर मध्ये बिघाडीचे स्वरूप मोठे असल्यास व दुरूस्तीस वेळ लागत असल्यास शाखेचे कामकाजात बाधा निर्माण होवू नये म्हणून निविदा धारकाने तातडीने स्टॅन्डबाय जनरेटर संबंधीत शाखेला पुरवावा लागेल. त्यासंबंधीचा वेगळा चार्ज देण्यात येईल.

११ सर्व्हीसींग देखभाल वार्षिक शुल्क सर्व्हिसींगचे काम पूर्ण झालेनंतर व शाखांचे अहवाल प्राप्त झालेनंतर पेमेंट वेळोवेळी अदा करण्यात येईल.

१२) निविदाधारकाकडून कराराचे कालावधीत जनरेटर संचाची निट देखभाल ठेवणे /सर्व्हिसींग करणे/वेळेत दुरूस्तीचे काम करणे, हया बाबींची पुर्तता न झाल्यास किंवा अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास सदर करारनामा कोणत्याही पातळीवर समाप्त करण्याचा अधिकार बँकेस राहील.

१३) प्राप्त निविदा मंजूर अथवा रद्द करणेचा अधिकार बँक राखुन ठेवत आहे.

१४) निविदा पाठवितांना मोहरबंद पाकीटात पाठवून त्यावर ५ केव्हीए जनरेटर संच वार्षिक देखभाल करार निविदा असे नमुद करुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, दि अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,अकोला यांचे नावाने दि.३०.६.२०२२ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत बँकेचे मुख्य कचेरी, येथे पाठवाव्यात. विलंबाने आलेल्या निविदांचा विचार केल्या जाणार नाही.

दि.२२.६.२०२२

मुख्य कार्यकारी अधिकारी

Estate&M1/872